<table>
<tr><td rowspan="5">सीएनआर.क्र. एमएचबीयु-१५००००९८२०२४</td><td>दाखल दिनांक</td><td>:</td><td colspan="3">२५/०१/२०२४.</td></tr>
<tr><td>नोंदणी दिनांक</td><td>:</td><td colspan="3">२५/०१/२०२४.</td></tr>
<tr><td>निकाल दिनांक</td><td>:</td><td colspan="3">१५/०५/२०२६.</td></tr>
<tr><td rowspan="2">कालावधी</td><td rowspan="2">:</td><td>वर्षे</td><td>महिने</td><td>दिवस</td></tr>
<tr><td>०१</td><td>०३</td><td>२०</td></tr>
</table>

**भाग-अ**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, देऊळगावराजा, ता. देऊळगावराजा, जि. बुलडाणा यांचे न्यायालयात

**(पिठासीन अधिकारी : श्री. एम. एस. भरड)**

**नियमीत फौजदारी खटला क्र.२०/२०२४.** **निशाणी क्र. २६.**

**देऊळगावराजा पोलिस ठाणे गु.र.नं.३०६/२०२१,**

| | | |
|---|---|---|
| अभियोग पक्ष | : | **महाराष्ट्र शासन**<br>मार्फत : पोलीस ठाणे अंमलदार,<br>पोलीस ठाणे अंढेरा, ता. देऊळगावराजा, जि. बुलडाणा. |
| अभियोग पक्षातर्फे विधीज्ञ | : | श्री. ए.एस. शेळके |
| | | **विरुध्द** |
| आरोपीचे नाव, वय व पत्ता | : | **इंद्रजित शहादेव मुंढे,**<br>वय ५० वर्षे, धंदा : शेती,<br>रा. धोत्रा नंदई, ता. देऊळगावराजा,<br>जि. बुलडाणा. |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | : | श्री. आर.एन. इंगळे |

**भाग-ब**

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | : | ०९/०५/२०२३ |
| गुन्हा दाखल दिनांक | : | ११/०५/२०२३ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | : | २५/०१/२०२४ |
| दोषारोप तयार केल्याचा दिनांक | : | २०/०२/२०२६ |
| पुरावा सुरू केल्याचा दिनांक | : | २०/०२/२०२६ |
| न्यायनिर्णयास ठेवल्याचा दिनांक | : | १५/०५/२०२६ |

| | | |
|---|---|---|
| न्यायनिर्णयाचा दिनांक | : | १५/०५/२०२६ |
| दोषी ठरल्याचा दिनांक, जर असल्यास | : | – |

## आरोपीची सविस्तर माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक केल्याचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | दोषारोप कलम | निर्दोष अथवा दोषी | शिक्षा दिली असल्यास किती | न्यायालयीन बंदी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | इंद्रजित शहादेव मुंढे, | २५.०१.२०२४ | २५.०१.२०२४ | भा.दं.वि. कलम ३२५, २९४, ५०६ | निर्दोष | - | - |

## भाग-क
## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार / आरोपीतर्फे साक्षीदार / न्यायालयीन साक्षीदार यांची यादी

### अ. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| १. | संतोष दिनकर मुंढे | फिर्यादी |

### ब. आरोपीतर्फे साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

### क. न्यायालयीन साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

## अभियोग पक्ष / आरोपी / न्यायालयीन पुराव्यांची यादी

### अ. अभियोग पक्षाचा पुरावा

| निशाणी क्र. | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|
| नि.क्र. २१ | जखमीचे प्रमाणपत्र |
| नि.क्र. २२ | घटनास्थळ पंचनामा |
| नि.क्र. २३ | जप्ती पंचनामा |

| | |
|---|---|
| नि.क्र. २४ | मुद्देमाल पावती |

**ब. आरोपीतर्फे पुरावा**

| निशाणी क्र. | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|
| | निरंक |

**क. न्यायालयीन पुरावा**

| निशाणी क्र. | कागदपत्रांचे वर्णन |
|---|---|
| | निरंक |

**ड. मुद्देमाल**

| अ. क्र. | मुद्देमाल क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | २५/२०२३ | एक कुऱ्हाडीचा लाकडी दांडा २ फुट साडेचार इंच लांबीचा व ४ इंच गोलाई असलेला व एक लाकडी मुठ असलेला लोखंडी विळा. |

## न्यायनिर्णय

(जाहीर दिनांक : १५/०५/२०२५ रोजी घोषीत)

आरोपी हा भारतीय दंड विधान कलम ३२५, २९४, ५०६ प्रमाणे खटल्यास सामोरे जात आहे.

**अभियोग पक्षातर्फे थोडक्यात हकीगत पुढीलप्रमाणे :-**

**२.** सदर खटल्यात संतोष दिनकर मुंढे हे फिर्यादी आहेत. त्यांनी अशी आशयाची फिर्याद दिली की, दि.०९/०५/२०२३ रोजी ०५.३० वाजणेचे सुमारास फिर्यादी हे नातेवाईक गजानन श्रीराम सानप रा. खळेगाव ता. लोणार यांच्या मुलीच्या नंदई-सौंदई देवीच्या नवसाच्या जावळाचा कार्यक्रमाच्या पंगतीमध्ये जेवणाकरता बसलेले असतांना स्वंयपाकी मधुकर पालवे यांना पंगतीत वाढत असलेल्या लोकांना दोन-चार मटनाचे पिस व खडे शिल्लक वाढण्याकरिता आग्रह केला असता तेथे हजर असलेले इंद्रजीत शहादेव मुंढे हा फिर्यादीच्या अंगावर धाऊन आला व "तुझ्या आईची गांड, तुझ्या आईचा फोदा" असे अश्लिल शिवीगाळ करून "तु त्यांनाच का जास्त मटनाचे खडे वाढण्यास सांगतो" असे म्हणुन हातात विळा घेऊन "तुला विळ्याने कापुन टाकतो" असे म्हणाले असता तेथे हजर लोकांनी त्याच्या हातातील विळा हीसकाऊन घेतला. त्यानंतर त्याने पुन्हा हातात कु-हाडीचा दांडा घेऊन आला व त्या दांडयाने फिर्यादीच्या नाकावर मारून जखमी केले. तेव्हा तेथे हजर असलेले परमेश्वर चाटे व अरूण नागरे यांनी भांडणाची सोडवासोडव केली. तेव्हा आरोपीने फिर्यादीला "तु आज सुटला तु पुन्हा भेटल्यास तुला जीवाने मारून टाकतो" अशी मारण्याची धमकी दिली. करिता सदरील फिर्याद.

**३.** प्रस्तुतची फिर्याद **गु.र.नं.१३१/२०२३** अन्वये नोंदविण्यात आला व पुढील

तपास तपासी अंमलदार पो.हे.कॉ. रामेश्वर अ. आंधळे, अंढेरा पोलीस ठाणे यांचेकडे सुपुर्द करण्यात आला. तपासा दरम्यान त्यांनी साक्षीदारांची तपास टिपणे नोंदविली. दोन पंचांसमक्ष घटनास्थळ जप्ती पंचनामा केले. आरोपीला अटक केली. तपासा अंती आरोपीविरुध्द गुन्हादर्शक तथ्य मिळून आल्याने सदरील दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान कलम ३२५, २९४, ५०६ अन्वये दोषारोप **निशाणी-१४** प्रमाणे निश्चित केले. सदर दोषारोप आरोपीस त्याच्या भाषेमध्ये वाचून दाखविले असता त्यांनी गुन्हा कबुल नसल्याचे सांगितले व खटला पुढे चालविण्याची विनंती केली.

५. उपलब्ध तोंडी व कागदोपत्री पुरावा आणि उभय पक्षाच्या विधीज्ञांचा मौखिक युक्तीवाद ऐकला, त्यावरुन खालील मुद्दे निश्चित करुन त्याचा निष्कर्ष कारणमिमांसावरुन खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष असे सिध्द करतो का की, दि.०९/०५/२०२३ रोजी सकाळी ०५.३० वाजणेचे सुमारास मौजे खळेगाव, ता. लोणार, जि. बुलडाणा हद्दीतील आरोपी याने फिर्यादीस कुऱ्हाडीचा दांडा मारून गंभीर दुखापत पोहचविली का ? | : | **नकारार्थी.** |
| २. | अभियोग पक्ष असे सिध्द करतो का की, उपरोक्त नमूद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपीने फिर्यादीस "तुझ्या आईची गांड, तुझ्या आईचा फोदा" अशी अश्लील शिवीगाळ का ? | : | **नकारार्थी.** |
| ३. | अभियोग पक्ष असे सिध्द करतो का की, उपरोक्त नमूद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपीने फिर्यादला जिवे मारण्याची धमकी देऊन फौजदारीपात्र धाकदपटशाचा अपराध केला का ? | : | **नकारार्थी.** |
| ४. | अंतिम आदेश काय ? | : | **आरोपी याची निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.** |

## कारणमिमांसा

६. आरोपीविरुध्दचे आरोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने **साक्षीदार क्र.१ - संतोष दिनकर मुंढे,** (फिर्यादी) यांना **निशाणी-२०** वर तपासले आहे. फिर्यादीने नि.क्र. २५ वर लेखी पुरसिस देऊन त्यांना इतर साक्षीदार तपासावयाचे नसल्याचे नमुद केले आहे. त्यामुळे नि.क्र. २५ अन्वये व अभियोग पक्षाच्या तोंडी विनंतीवरून नि.क्र. १ वर सविस्तर आदेश पारित करून पुरावा बंद करण्यात आला.

७. अभियोग पक्षाच्या साक्षीचे अवलोकन केले असता आरोपीविरुध्द गुन्हादर्शक तथ्य

आढळून न आल्याने आरोपीचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वयेचा जबाब वगळण्यात आला.

**मुद्दा क्र.१ ते ३ करीता :-**

८. मुद्दा क्र.१ ते ३ हे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे त्यांचे विवेचन सोयीसाठी एकत्रितरित्या विचारात घेण्यात येत आहेत.

९. फिर्यादी व आरोपीने **निशाणी-१९** प्रमाणे तडजोडपत्र दाखल केले आहे, परंतु सदरचे गुन्हे तडजोडीस अपात्र असल्यामुळे तडजोड मान्य करण्यात आली नाही.

१०. अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द आरोप सिध्द करण्यासाठी **साक्षीदार क्र.१ - संतोष दिनकर मुंढे,** (फिर्यादी) यांना **निशाणी-२०** वर नोंदवली असुन सदर साक्षीदाराने त्याच्या साक्षीमध्ये घटना कधी, कोठे, केंव्हा व कशी घडली याबाबतीत माहित नसल्याचे नमुद केलेले आहे. वरील सर्व नमुद साक्षीदार हे त्यांच्या पुर्वीच्या जबाबास मुखर झाल्याने त्यांना उलट तपासाप्रमाणे प्रश्न विचारण्याची परवानगी सरकारी अभियोक्ता द्वारे मागण्यात आली. परवानगी दिली असता सदरील फिर्यादीने घटना घडली नसल्याचे सांगून त्याला विचारलेल्या इतर प्रश्नांची उत्तरे नकारार्थी दिली आहेत.

११. अभियोग पक्षाच्या पुराव्याचे अवलोकन केले असता जरी आरोपीने घटनास्थळ पंचनामा मान्य केले असलेतरी फिर्यादीने अभियोग पक्षास सहकार्य न केल्याने अभियोग पक्ष फिर्याद शाबीत करण्यास असमर्थ ठरला आहे. त्यामुळे, अभिलेखावरील पुरावा जशास-तसा गृहित धरला तरी सदरील पुरावा हा गुन्ह्याची साखळी पुर्ण करण्यास व आरोपीस गुन्ह्याशी जोडण्यास अपुरा आहे. जरी कायद्याची अशी स्थित परिस्थिती आहे की, एका साक्षीदाराचा पुरावा हा सत्यतेच्या कसोटीपुर्ण करणारा असावा लागतो. परंतु, वर नमुद केल्याप्रमाणे दप्तरी तपासण्यात आलेल्या साक्षीदाराचा पुरावा सदरची कसोटी पुर्ण करण्यास अपुरा आहे. एकंदरीत अभियोग पक्षाने दि.०९/०५/२०२३ रोजी ०५.३० वाजणेचे सुमारास फिर्यादी हे नातेवाईक गजानन श्रीराम सानप रा. खळेगाव ता. लोणार यांच्या मुलीच्या नंदई-सौंदई देवीच्या नवसाच्या जावळाचा कार्यक्रमाच्या पंगतीमध्ये जेवणाकरता बसलेले असतांना स्वंयपाकी मधुकर पालवे यांना पंगतीत वाढत असलेल्या लोकांना दोन-चार मटनाचे पिस व खडे शिल्लक वाढण्याकरिता आग्रह केला असता तेथे हजर असलेले इंद्रजीत शहादेव मुंढे हा फिर्यादीच्या अंगावर धाऊन आला व "तुझ्या आईची गांड, तुझ्या आईचा फोदा" असे अश्लिल शिवीगाळ करून "तु त्यांनाच का जास्त मटनाचे खडे वाढण्यास सांगतो" असे म्हणुन हातात विळा घेऊन "तुला विळ्याने कापुन टाकतो" असे म्हणाले असता तेथे हजर लोकांनी त्याच्या हातातील विळा हीसकाऊन घेतला. त्यानंतर त्याने पुन्हा हातात कु-हाडीचा दांडा घेऊन आला व त्या दांडयाने फिर्यादीच्या नाकावर मारून जखमी केले. तेव्हा तेथे हजर असलेले परमेश्वर चाटे व अरूण नागरे यांनी भांडणाची सोडवासोडव केली. तेव्हा आरोपीने फिर्यादीला "तु आज सुटला तु पुन्हा भेटल्यास तुला जीवाने मारून टाकतो" अशी मारण्याची धमकी दिली या बाबी संशयाच्या पलीकडे शाबीत केली नाही. करीता मी **मुद्दा क्र.१ ते ३** चा निष्कर्ष **नकारार्थी** नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.४ करिता :-**

**१२.** **मुद्दा क्र.१ ते ३** च्या **नकारार्थी** निष्कर्षाअंती मी **मुद्दा क्र.४** च्या निष्कर्षा दाखल पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे :-

| **आदेश** | |
|---|---|
| १) | आरोपी **इंद्रजित शहादेव मुंढे,** यांची **भारतीय दंड विधान कलम ३२५, २९४, ५०६ अन्वये** या गुन्ह्यातुन **फौजदारी प्रकिया संहिता कलम २४८(१)** अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |
| २) | आरोपीचे जामीनपत्र व बंधपत्र रद्द करण्यात येत आहे. |
| ३) | या प्रकरणातील जप्त मुद्देमाल एक कुऱ्हाडीचा लाकडी दांडा २ फुट साडेचार इंच लांबीचा व ४ इंच गोलाई असलेला व एक लाकडी मुठ असलेला लोखंडी विळा हे मुल्यहिन असल्यामुळे आव्हान कालावधीनंतर नियमाप्रमाणे नष्ट करण्यात यावा. |
| ४) | आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ४३७(अ) अन्वये रक्कम रु.१५०००/- (रुपये पंधरा हजार फक्त) चे वैयक्तीक बंधपत्र व जामीनपत्र द्यावे. सदर बंधपत्र पुढील सहा महिन्याच्या कालावधीसाठी अस्तित्वात राहतील. |
| (न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित) | |

MAHESH SUNILDATT BHARAD

Digitally signed by MAHESH SUNILDATT BHARAD
Date: 2026.05.15 15:32:24 +0530

**(श्री. एम. एस. भरड)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, कोर्ट क्र.१,
देऊळगावराजा, जि. बुलडाणा

दिनांक : १५/०५/२०२६.

प्र मा ण प त्र

“ मी याची पुष्टी करतो की, सदरील पीडीएफ फाईलमधील प्रत्येक शब्द नी शब्द हे मुळ आदेश/न्यायनिर्णयाप्रमाणे सारखेस आहेत.”

लघुलेखकाचे नाव :- श्री. रुपेश शोभा अशोक दांडगे,
न्यायालयाचे नाव :- प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, कोर्ट क्र. १, देऊळगावराजा.
आदेश/न्यायनिर्णयाचा दिनांक :-१५.०५.२०२६
श्रुतलेखनाचा दिनांक :- १५.०५.२०२६
तपासलेले आणि स्वाक्षरी दिनांक :- १५.०५.२०२६
अपलोड केल्याचा दिनांक :- १५.०५.२०२६

स्वा/-
(श्री. रुपेश शोभा अशोक दांडगे,)
लघुलेखक.